महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळास सन २०१७-१८ या वर्षाकरिता सहाय्यक अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. लविम-२०१७/प्र.क्र.१५७/उद्योग-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- १६ /११ /२०१७

शासन निर्णय:-

सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाकरिता हस्तकला उद्योग विकास या प्रधान लेखाशिर्षाखाली ३१ सहायक अनुदान (वेतनेत्तर) या उद्दिष्टाखाली रुपये १,००,००,०००/- (रुपये एक कोटी फक्त) इतकी तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. त्यापैकी उद्योग ऊर्जा व कामगार विभाग प्रशासन १ कार्यासनाच्या दिनांक ५/७/२०१७ च्या परिपत्रकान्वये ७०% मर्यादेत रु.७० लक्ष इतका निधी नियंत्रण अधिका-यांकडे सुपुर्द करण्यात आलेला आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी रुपये ७०,००,०००/- (रुपये सत्तर लाख फक्त) इतके सहायक अनुदान या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर अनुदान अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर दर्शविल्याप्रमाणे खर्च करण्यात यावे.

२. यावरील खर्च मागणी क्र. के-७, २८५१ ग्रामोद्योग व लघुद्योग, (००) १०४ हस्तव्यवसाय उद्योग (००) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजना (००) (०२) हस्तव्यवसाय उद्योगाचा विकास (२८५१ ०५६७) ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षाकरीता मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर रकमेच्या आहरण व संवितरणाचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांना देण्यात येत असून उक्त प्रयोजनाकरिता करण्यात आलेल्या खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र महामंडळाने विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांना सादर करावे. लेख्याच्या खर्चमेळाबाबत महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई व महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२ नागपुर यांच्या कार्यालयास विहीत कालावधीत अवगत करावे.

४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांनी उपरोक्त प्रयोजनावर खर्च झालेल्या मासिक निधीची आकडेवारी कार्यासन अधिकारी (प्रशासन-१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना दर महिन्याच्या १० तारखेपुर्वी सादर करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७१११६१२०७५५६२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajiv Madhav Ambikar

Digitally signed by Rajiv Madhav Ambikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4afb47d807935092599a3e28024dd3d3c461bada30a950e81e666a02aad578f5, cn=Rajiv Madhav Ambikar
Date: 2017.11.16 12:11:59 +05'30'

(राजीव आंबीकर)
कक्ष अधिकारी

प्रति:- माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१ विकास आयुक्त (उद्योग),उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.
२ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई.
३ वित्त नियंत्रक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई.
४ लेखाअधिकारी, विकास आयुक्त (उद्योग),उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.
५ महालेखपाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
६ महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२ नागपुर.
७ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८ संचालक, लेखा व कोषागारे,फ्री प्रेस जनरल मार्ग, मुंबई.
९ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१० कक्ष अधिकारी, वित्त विभाग (अर्थसं-१४ व व्यय-१६), मंत्रालय,मुंबई.
११ कक्ष अधिकारी, (प्रशासन-१)उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.
१२ निवड नस्ती/उद्योग-६.